# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/03/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## घरफोडी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील सावनेर नागपुर रोड दादाजी नगर रिलायन्स पेट्रोलपंप समोर दि. ०१/०३/२०२३ चे २०.०० वा. ते दि. ०२/०३/२०२३ चे ०३.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— मोटु रामचंद्र बारई, वय २७ वर्ष, रा. यशवंमबाबा झोपडपटटी सावनेर याने फिर्यादी नामे— ईशाद बब्बु शेख, वर्ष ३२ वर्ष, रा. वार्ड क्र. १२ अभ्यंकर शाळेजवळ मुरलीधर मंदीर रोड सावनेर यांचे जैस्वाल लॉनचे वाल कंपाउडचे भिंतीवर चढुन बंद रुमचा दरवाजा उघडुन रुमचे आतमध्ये प्रवेश करून एका बोरीवर kkk असे इंग्रजीमध्ये नाव असलेले उघडलेले बोरीत अंदाजे १० ते १२ किलो तांदुळ अंदाजे किंमती ४००/— रू. व एक लोखंडी हातोडी त्यावर निळा रंग व मुठ लोखंडी पाइप असलेली अंदाजे किंमती ५०/—रू. व एक पिवळया रंगाची ग्राइंडर मशिन Vipower कंपनीची माफडेल नं. pa6-GF30 अंदाजे किंमती २०००/—रू असा एकुण २४५०/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक व्यंकटेश दोनोडे मो. नं. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. अरोली :— अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील नांदगाव शिवार रामटेक ते खात रोड नितीन धर्मकाटा समोर दिनांक २८/०२/२०२३ चे १६.१५ वा. ते १६.३० वा. दरम्यान यातील **मृतक नामे— महेश लक्ष्मण राउत, वय ३५ वर्ष, रा. पिटेसूर ता. तूमसर जि. भंडारा** हा रोडचे काम करून मौजा मसला गावावरून कोदामेंढी मार्गे त्याचे स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम. एच. —३१/बीएम —६०५० नी पिटेसूर येथे गावी जात असता मौजा नांदगाव शिवार रामटेक ते खात रोड नितीन धर्मकाटा समोर आरोपी स्वराज कंपनीचा निळया रंगाचा ट्रॅक्टर क्र. एम. एच. —४०/११६६ च्या चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली भरधाव वेगाने व निष्काळजीपणे विरूध्द दिशेने चालवत आणून यातील मृतक महेश लक्ष्मण राउत यांचे मोटारसायकलला धडक मारल्याने सदर अपघातात मृतक हा गंभीर जखमी होउन त्यास उपचारकामी प्राथमिक आरोग्य केंद्र कोदामेंढी येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोंषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— लक्ष्मण कशवा राउत, वय ६५ वर्ष, रा. पिटेसूर ता. तूमसर जि. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपी ट्रॅक्टर ट्रॉली चालकाविरुध्द कलम २७९, ३०४, (अ) भादवि. सहकलम १३४, १८४/१७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी हा घटनास्थळरवरून पसार झाला. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक राजेश जोशी पोस्टे अरोली मो. नं. ७८७५९६६६७६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**